प्रकरण दुसरे :

# हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाची पार्श्वभूमी

## प्रकरण दुसरे

## हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाची पार्श्वभूमी

हमालांचे सामाजिक - आर्थिक जीवन अभ्यासताना हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाची पार्श्वभूमी अभ्यासणे तितकेच महत्वाचे ठरते. कामाची अनिश्चितता, परिणामी वेतनाची अशाश्वती असे हमाली व्यवसायाचे स्वरूप असताना व्यक्ती हमालीकडे का वळते, याचे उत्तर त्यांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाची पार्श्वभूमी अभ्यासल्याविना मिळू शकत नाही. यासाठी हमालांची प्राथमिक माहिती, त्यांच्या आर्थिक पार्श्वभूमीमध्ये मूळ व्यवसाय व त्यातील उत्पन्न, आणि स्थलांतर पार्श्वभूमीमध्ये तालुका-जिल्हा-राज्य-स्थलांतर याविषयी माहितीचे संकलन केले आहे, त्या बाबींचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे :

### १. प्राथमिक माहिती :

हमालांविषयी प्राथमिक माहिती घेताना हमाली व्यवसायातील स्त्री-पुरुष प्रमाण [लिंगानुसार वर्गीकरण], वयोमानानुसार वर्गीकरण, जाती-धर्मानुसार प्रमाण आणि हमालांमधील शिक्षण प्रसार ह्या बाबी समजून घेतल्या आहेत.

### अ] लिंग :

सामान्यत:, हमालांमध्ये पुरुषांचे प्रमाण अधिक असते. हमाली व्यवसायामध्ये स्त्रिया अत्यंत मर्यादित प्रमाणात आढळून येतात. अभ्यासासाठी निवडलेल्या विभागांमधूनसुद्धा याच गोष्टी स्पष्ट होतात. यासंबंधीची स्पष्ट कल्पना सारणी क्र. १ च्या आधारे येते.

सारणी क्र. १ - प्रतिसादकांचे लिंगानुसार वर्गीकरण

| | विभाग | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | वाहतूक | ४५ [१००%] | - | ४५ [१००%] |
| २. | कृषि-उत्पन्न-विनिमय | ३९ [९२.८५%] | ३ [७.१४%] | ४२ [१००%] |
| ३. | धान्यबाजार | ३३ [८६.८४%] | ५ [१३.१५%] | ३८ [१००%] |
| | एकूण | ११७ [९३.६%] | ८ [६.४%] | १२५ [१००%] |

कोल्हापूर शहरातील हमालांच्या केलेल्या पाहणी अंती असे दिसून येते की, हमालांमध्ये पुरुषांचे प्रमाण अधिक असून स्त्रियांचे प्रमाण नगण्य आहे. एकूण १२५ हमालांपैकी ११७ [९३.६% ] हमाल हे पुरुष, तर फक्त ८ [६.४%] स्त्री हमाल आहेत. विभागवार लिंगभेदानुसार स्त्री-पुरुषांचे प्रमाण अभ्यासल्यानंतर असे दिसून येते की, अवजड ओझी उचलण्याच्या कामामुळे वाहतूक विभागामध्ये एकही स्त्री हमाल आढळत नाही. परंतु धान्यबाजारामध्ये ५ स्त्रिया व कृषि-उत्पन्न-विनिमय विभागामधील गूळ विभागाकडे ३ स्त्रिया आढळून आल्या. याचे कारण, धान्यबाजारमधील स्त्रिया सहकारी बझारमध्ये काम करतात. त्या ठिकाणाचे काम धान्य निवडणे, किलोची पॅकिंग करणे, पॅकिंगवर नोंद करणे अशा हलक्या स्वरूपाची असतात. तसेच, गूळ विभागामध्ये ओझी उचलण्याचे काम असले तरी गूळाच्या ढेपा ३५ किलो किंवा त्यापेक्षा कमी वजनाच्या असतात, हे काम स्त्रियांना शारीरिक दृष्टया

शक्य होते.

थोडक्यात, पाहणीनुसार हमालांमध्ये पुरूषांचे प्रमाण अधिक होते. स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत अत्यल्प होते.

[ब] <u>वय :</u>

सततच्या शारीरिक कष्टाच्या कामामुळे व्यक्ती उतार वयामध्ये कष्टाची कामे करू शकत नाही. सहाजिकच हमालांमध्ये मध्यमवयीन हमालांचे प्रमाण अधिक असते. सारणी क्र. २ वरून हमालांचे वयोगटानुसार प्रमाण स्पष्ट होते.

<u>सारणी क्र. २</u> - <u>प्रतिसादकांचे वयोगटानुसार वर्गीकरण</u>

| विभाग | १५ ते २० | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ ते ५५ | ५५ ते ६० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहतूक | - | १६ [३५. ५५%] | १५ [३३. ३३%] | ८ [१७. ७७%] | ३ [६. ६६%] | ३ [६. ६६%] | ४५ [१००%] |
| कृषी-उत्पन्न विनिमय | २ [४. ७६%] | २० [४७. ६१%] | १० [२३. ८०%] | ६ [१४. २८%] | ४ [९. ५२%] | - | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | ३ [७. ८९%] | १६ [४२. १०%] | १३ [३४. २१%] | ५ [१३. १५%] | १ [२. ६३%] | - | ३८ [१००%] |
| एकूण | ५[४%] | ५२ [४१. ६%] | ३८ [३०. ४%] | १९ [१५. २%] | ८ [६. ४%] | ३ [२. ४%] | १२५ [१००%] |

हमालांच्या वयानुसार पाहणीसाठी सहा वयोगट करण्यात आले. या सहा वयोगटांच्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, २१ ते ३० वयोगटामध्ये सर्वाधिक हमालांचा समावेश होतो, तर वयाच्या ५१ च्या वर्षानंतरही हमाली काम करणारे नगण्य होते. २१ ते ३० वयोगटातील हमालांची संख्या ५२ [४१. ६ टक्के] होती. ३० वर्षापुढील प्रत्येक वयोगटांचा आढावा घेता, पुढील प्रत्येक वयागटामध्ये हमालांचे प्रमाण कमी आढळते. ३१ ते ४० वयोगटातील हमाल ३८ [३०. ४% ] होते. ५१ ते ५५ वयोगटातील हमाल ८ [६. ४ टक्के] होते.

तुलनात्मक दृष्टया वयोगटानुसार वर्गीकरणाचा आढावा घेतल्यास लक्षात येते की एकूण हमालांपैकी ९० हमाल हे २१ ते ३० आणि ३१ ते ४० या दोन वयोगटातील होते. म्हणजेच, २१ ते ४० या वयोगटातील हमालांचे प्रमाण ७२ टक्के होते. तसेच, विशषत्वाने जाणवण्यासारखी बाब म्हणजे, वयाच्या ५५ नंतर हमाली करणाऱ्या व्यक्ती केवळ ३ [२. ४ टक्के] असून त्या वाहतूक विभागातील होत्या. ५५ ते ६० वयोगटातील हमाल धान्यबाजार व कृषि-उत्पन्न विनिमय विभागामध्ये आढळून आले नाहीत. याचे कारण हमालांच्या मुलाखती मधून असे स्पष्ट होते की हंगामी काम व कमी वेतन यामुळे कामाच्या ठिकाणी कुटुंबासहित राहणे अशक्य होते व उतार वयामुळे एकटे राहण्यास शारिरिकदृष्टया सशक्त नसतात.

थोडक्यात, अतिशारीरिक कष्टाच्या कामामुळे उतार वयात हमालीमधून निवृत्त होणाऱ्यांचे प्रमाण अधिक असते, हे वरील सारणीच्या विश्लेषणावरून स्पष्ट होते.

क] <u>जात :</u>

हमालांच्या प्राथमिक माहितीचा एक भाग म्हणून हमालांचे जातीनुसार वर्गीकरण अभ्यासल्यानंतर पुढील जातीवार प्रमाण दिसून आले. सारणी क्र. ३ हमालांचे जातीनुसार वर्गीकरणाचा निर्देश करते.

<u>सारणी क्र. ३</u> - <u>प्रतिसादकांचे जातीनुसार वर्गीकरण</u>

| विभाग | मराठा | धनगर | अनुसूचित जात | इतर जातीय | मुस्लीम | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| वाहतूक | ३५ [७७.७७%] | - | ३ [६.६६%] | ५ [११.११%] | २ [४.४४%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न-विनिमय | २४ [५७.१४%] | ८ [१९.०४%] | ४ [९.५२%] | ६ [१४.२८%] | - | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | २२ [५७.८९%] | ११ [२८.९४%] | ३ [७.८९%] | २ [५.२६%] | - | ३८ [१००%] |
| एकूण | ८१ [६४.८%] | १९ [१५.२%] | १० [८%] | १३ [१०.४%] | २ [१.६%] | १२५ [१००%] |

सारणी क्र. ३ च्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, सर्वच विभागांमधून मराठा जातीचे हमाल हे सर्वाधिक होते, तर महार, मांग, चांभार या अनुसूचीत जातीच्या  हमालांची संख्या तुलनेत कमी होती. एकूण हमालांपैकी, ८१ [६४.८ टक्के] हमाल हे मराठा जातीतले होते.

महार, मांग, चांभार या अनुसूचीत जातींचे हमाल १० [८ टक्के] होते. इतर जातीतील हमालांची संख्या १३ [१०.४ टक्के] होती. इतर जातीय हमालांमध्ये जैन, लिंगायत, कोळी, गवळी या समूहातील लोकांचा समावेश होतो. इतर धर्मीय हमालांचे प्रमाण पाहता, केवळ २ [१.६%] हमाल मुस्लीम धर्मीय आढळून आले.

तुलनात्मकदृष्टया जातीनुसार वर्गीकरणाचे विश्लेषण करता असे दिसून येते की, मराठा जातीतील हमालांच्या तुलनेत इतर सर्व जातीतील हमालांचे प्रमाण अत्यंत कमी होते. मराठा जातीतील हमाल ६४.८ टक्के होते, तर मराठेतर हमालांचे एकूण प्रमाण ३५.२ टक्के होते.

ड] शिक्षण :

सर्वसाधारणपणे ज्यांच्यात शिक्षणाचा अभाव आहे अशांनी हमाली व्यवसायात प्रवेश केलेला दिसून येतो. सारणी क्र. ४ हमालांमधील शैक्षणिक प्रगतीचे विश्लेषण दर्शविते.

सारणी क्र. ४ - प्रतिसादकांचे शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण

| विभाग | निरक्षर | ४थी पर्यंत | ५वी ते ७वी | ८वी ते १०वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| वाहतूक | २३ [५१.११%] | ११ [२४.४४%] | ६ [१३.३३%] | ५ [११.११%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न विनिमय | २४ [६३.१५%] | ८ [१९.०४%] | ७ [१६.६६%] | ३ [७.१४%] | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | २४ [६३.१५%] | ६ [१५.७८%] | ६ [१५.७८%] | २ [५.२६%] | ३८ [१००%] |
| एकूण | ७१ [५६.८%] | २५ [२०%] | १९ [१५.२%] | १० [८%] | १२५ [१००%] |

हमालांच्या पाहणी अंती असे दिसून येते की, हमालांमध्ये निरक्षरतेचा प्रश्न गंभीर आहे. एकूण हमालांपैकी ७१ [५६.८ टक्के] हमाल निरक्षर होते, तर साक्षर हमाल ५४ [४३.२ टक्के] होते. साक्षर हमालांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतल्यास शाळा गळतीचे प्रमाण चिंताजनक आढळते. साक्षर ५४ हमालांपैकी २५ [२० टक्के] हमालांचे शिक्षण ४थी पर्यंत, किंबहुना चौथ्या इयत्तेच्या आतच बंद झाले आहे. तर ८वी ते १० दरम्यान शिक्षण झालेले हमाल केवळ १० [८टक्के] होते. वयोमानानुसार शैक्षणिक पात्रतेचा विचार करता निरक्षरांमध्ये ६९ टक्के हमाल ३० वर्षे वयापुढील होते. तर ८वी ते १०वी दरम्यान शिक्षण झालेल्यांमध्ये ७ हमाल ३० वर्षे वयाच्या आतील होते. यावरून ग्रामीण भागामध्ये स्वातंत्र्योत्तर प्रारंभिक काळात शैक्षणिक प्रसाराचा असलेला अभाव, परिणामी हमालांमध्ये असलेले निरक्षरता व अत्यल्प शिक्षणाचे प्रमाण पाहता प्रतिसादकांनी हमाली व्यवसाय का पत्करला याची स्वाभाविकता स्पष्ट होते.

## २. आर्थिक पार्श्वभूमी

हमालांचे सामाजिक-आर्थिक जीवन अभ्यासताना हमालांच्या कुटुंबाला लाभलेल्या आर्थिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे तितकेच अपरिहार्य आहे. हमालांच्या व्यवसाय स्वीकृतीच्या कारणांचा शोध घेताना त्यांची आर्थिक स्थिती महत्त्वाची बाब ठरते. किंबहुना हमालांच्या आर्थिक पार्श्वभूमीच्या आकलनाशिवाय त्यांच्या आर्थिक जीवनाची यथार्थ कल्पना येऊ शकत नाही. या उद्देशानेच हमालांच्या कुटुंबियांची स्थावर मालमत्ता, तसेच कुटुंबाचा मूळ व्यवसाय व त्यातून मिळणारे उत्पन्न

याविषयी माहिती संकलित केली आहे, ती पुढील प्रमाणे :-

अ] स्थावर मालमत्ता :

कुटुंबाला लाभलेली स्थावर मालमत्ता हा आर्थिक उत्पन्नाचा एक भाग असतो. हमालांच्या संदर्भात त्यांची स्थावर मालमत्ता घर व शेती या स्वरूपात आढळते. सारणी क्र. ५ वरून हमालांच्या स्थावर मालमत्तेची कल्पना येऊ शकते.

सारणी क्र. ५ - हमालांच्या स्थावर मालमत्तेनुसार वर्गीकरण

| विभाग | मुळ गावी घर | | एकूण | शेती | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | | भूमीहीन | २ एकर पर्यंत | ५ एकरपर्यंत | ७ एकरपर्यंत | |
| वाहतूक | ४० [८८.८८%] | ५ [११.११%] | ४५ [१००%] | १४ [३१.११%] | १३ [२८.८८%] | १७ [३७.७७%] | १ [२.२२%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न विनिमय | ४० [९५.२३%] | २ [४.७६%] | ४२ [१००%] | ८ [१९.०४%] | १८ [४२.८५%] | १३ [३०.९५%] | ३ [७.१४%] | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | ३२ [८४.२०%] | ६ [१५.७८%] | ३८ [१००%] | ७ [१८.९२%] | १९ [५०%] | १२ [३१.५७%] | - | ३८ [१००%] |
| एकूण | ११२ [८९.६%] | १३ [१०.४%] | १२५ [१००%] | २९ [२३.२%] | ५० [४०%] | ४२ [३३.६%] | ४ [३.२%] | १२५ [१००%] |

...४२/-

सारणी क्र. ५ चे विश्लेषण पाहता असे दिसून येते की, बहुतांशी [८९.६ टक्के] हमालांचे मूळ गावी घर आहे.१५ हमालांची पक्की घरे सोडता बाकी सर्व हमालांची घरे कच्च्या मातीची आहेत. केवळ १३ [१०.४ टक्के] हमालांचे मूळ गांवी घर नाही. अधिक माहिती घेता असे स्पष्ट होते, १३ पैकी निम्म्याहून अधिक हमालांनी आपली गावाकडील घरे आर्थिक अडचणीमुळे विकली आहेत.

हमाल हे भूमीहीन असतात, असा एक साधारण समज आहे, परंतु पाहणीमधून असे दिसून येते की, भूमीहीन हमालांची संख्या २९ [२३.२ टक्के] होती, तर ९६ [७६.८ टक्के] हमाल भूधारक होते. अर्थात हे सर्व हमाल अल्पभूधारक होते. पैकी ५० [४० टक्के] हमालांची शेत जमीन २ एकर किंवा २ एकर पेक्षा कमी होती. ३ ते ५ एकर दरम्यान शेतजमीन असणाऱ्या हमालांची संख्या ४२ [३३.६ टक्के] होती. ७ एकरापर्यंत शेतजमीन असणारे हमाल अत्यल्प होते, त्यांचे प्रमाण ४ [३.२ टक्के] होते. याचा अर्थ गाव सोडून शहरामध्ये व्यवसायासाठी स्थलांतरीत होणाऱ्यांमध्ये अल्पभूधारकांचे प्रमाण अधिक आहे.

ब] <u>हमालांच्या कुटुंबाचा मूळ व्यवसाय व उत्पन्न :</u>

हमाली व्यवसायात प्रवेश करण्यापूर्वी हमालांचा मूळ व्यवसाय कोणता होता व त्यातील मिळकत या संबंधीची माहिती हमालांच्या हमालीपूर्व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करते. एकूण हमालापैकी ९६ [७६.८ टक्के] हमालांची शेतजमीन होती. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा निर्देश सारणी क्र. ६ करते.

सारणी क्र. ६ - शेतीमधील मासिक उत्पन्नानुसार वर्गीकरण

| शेतीमधील मासिक उत्पन्न | एक कमवती व्यक्ती असलेली कुटुंबे | दोन कमवती व्यक्ती असलेली कुटुंबे | तीन कमवती व्यक्ती असलेली कुटुंबे | एकूण कुटुंबे |
|---|---|---|---|---|
| ३०० रु. पर्यंत | ६३ | २ | - | ६५ [६७.७०%] |
| ३०१ ते ५०० पर्यंत | ११ | १६ | १ | २८ [२९.१६%] |
| ५०१ ते ६०० पर्यंत | - | २ | १ | ३ [३.१२%] |
| एकूण कुटुंबे | ७४ [७७.०८%] | २०[२०.८३%] | २[२.०८%] | ९६[१००%] |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, ९६ हमाल शेती व्यवसायातील उत्पन्न घेत होते, परंतु शेतीमधून मिळणारे उत्पन्न अत्यल्प असल्याचे शेतधारक प्रतिसादक हमालांनी सांगितले. ६५ [६७.७० टक्के] कुटुंबांचे शेतीमधील मासिक उत्पन्न ३०० रु. किंवा ३०० पेक्षा कमी होते. ५०१ ते ६०० रु. मासिक प्राप्ती असणारी कुटुंबे नगण्य आढळली. केवळ ३ [३.१२ टक्के] कुटुंबे शेतीमधून ५०१ ते ६०० रु. च्या दरम्यान मासिक उत्पन्न घेत होती. शेतीमध्ये काम करणाऱ्या कुटुंबसदस्यांची संख्या व मासिक यासंबंधीचे विश्लेषण पाहता, ७४ [७७.०८ टक्के] कुटुंबामध्ये शेतीमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या १ असली तरी त्यापैकी ६३ कुटुंबांचे उत्पन्न ३०० रु. च्या आतले होते. ५०१ ते ६०० रु. या उत्पन्न गटामधील सर्व कुटुंबांमधून शेतीमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती एकपेक्षा अधिक होत्या. थोडक्यात, शेतीमधील मासिक उत्पन्न व शेतीमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती यांचा तुलनात्मक विचार करता शेतीमधील उत्पन्न अल्प आढळते.

याचे कारण, सर्वच भूधारकांची जमीन कोरडवाहू, जिराईती, डोंगराळ आहे. तसेच शेतीसाठी पाणी पुरवठयाच्या सोयींचा अभाव असल्याने शेती ही पूर्णत: ऋतूमानाच्या लहरीवर अवलंबून असते.

ब] इतर व्यवसाय व उत्पन्न :

२९ भूमीहीन हमालांच्या कुटुंबांची आर्थिक पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न करता असे दिसून आले की हमाल शेतमजूर, उसतोडणी कामगार, बांधकामावर मजूर म्हणून काम करीत होते. परंतु ही कामे हंगामी स्वरूपाची असल्याने त्यामधून मिळणारे उत्पन्न सांगू शकले नाहीत. तसेच हमालांमधील स्त्री हमालांच्या कौटुंबिक व्यवसायाविषयी माहिती घेतली असता ६ स्त्री हमालांनी कौटुंबिक व्यवसाय व उत्पन्न याविषयी माहिती दिली. सारणी क्र. ७ मध्ये याविषयीचे विश्लेषण दिले आहे.

सारणी क्र. ७ - कुटुंबाचे इतर व्यवसाय व उत्पन्नानुसार वर्गीकरण

| मासिक उत्पन्न गट | एक कमवती व्यक्ती असलेली कुटुंबे | दोन कमवती व्यक्ती असलेली कुटुंबे | एकूण कुटुंबे |
|---|---|---|---|
| ५०१ ते ७०० | २ | - | २ [३३. ३%] |
| ७०१ ते ९०० | ३ | १ | ४ [६६. ६%] |
| एकूण कुटुंबे | ५ [८३. ३%] | १ [१६. ६%] | ६ [१००%] |

BARR. BA... KHARDEKAR LIBRARY ... KOLHAPUR

६ [४. ८%] स्त्री हमालांनी पुरविलेल्या माहितीनुसार कुटुंबाचे इतर व्यवसाय पानपट्टी, सायकल दुकान, खाजगी कंपनीत कारकून, हमाली अशा स्वरूपाचे होते. स्त्री हमालांचे पती, भाऊ, बहिण या व्यवसायात गुंतले होते. सारणीवरून असे दिसून येते की, सर्वच कुटुंबाचे उत्पन्न ५०० रु. च्या पुढील होते. तसेच ४ [६६. ६%] कुटुंबाचे मासिक उत्पन्न ७०१ ते ९०० रु. दरम्यान होते. तसेच केवळ १ [१६. ६ टक्के] कुटुंबामध्ये एकापेक्षा अधिक व्यक्ती काम करणा-या होत्या. मासिक उत्पन्न व कमवत्या व्यक्ती या अनुषंगाने सारणी क्र. ६ व सारणी क्र. ७ ची तुलना करता, शेतीमधील उत्पन्नापेक्षा इतर व्यवसायामधील उत्पन्न अधिक होते.

## ३. स्थलांतराची पार्श्वभूमी :

सामान्यत: लोक ग्रामीण भागातून शहराकडे व्यवसायाच्या निमित्ताने आलेले आढळतात. भूमीहीनता, अल्पशेती, दुष्काळ इत्यादी कारणांमुळे चरितार्थ चालविण्यासाठी लोक शहराकडे धाव घेतात. औद्योगिक शहरे ही रोजगार निर्मितीची केंद्रे आहेत. हमाली हा यापैकी एक रोजगार. हमाली व्यवसायामध्ये सुद्धा ग्रामीण भागातील लोक अधिकांश आढळतात. पाहणीमधील हमालाचे स्थलांतर काही ठराविक कालावधीत मोठ्या प्रमाणात झाले आहे. १९७० - ८० या कालावधीत २५ टक्के, ८१ ते ८५ या कालावधीत २२ टक्के आणि १९८७ या एका वर्षात १२ टक्के हमाल स्थलांतरीत झाले आहे. दुष्काळ व सततचे अवर्षण यामुळे हे हमाल स्थलांतरीत झाल्याचे आढळले. हमालांच्या आर्थिक पार्श्वभूमीबरोबरच स्थलांतराची पार्श्वभूमीसुद्धा अभ्यासणे तितकेच निकडीचे आहे. कारण स्थलांतराच्या पार्श्वभूमीच्या आकलनाने हमालांच्या

... ४६/-

आर्थिक परिस्थितीतील अडचणी, आर्थिक क्रियांवरील भौगोलिक क्षेत्राचा परिणाम स्पष्ट होतो. हमालांच्या स्थलांतराच्या पार्श्वभूमीचा तारणी क्र. ८ निर्देश करते.

सारणी क्र.८ - प्रतिसादकांचे त्यांच्यामूळ वास्तव्यानुसार वर्गीकरण

| विभाग | कोल्हापूर | राज्य स्थलांतरीत | जिल्हा स्थलांतरीत | | | तालुका स्थलांतरीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सोलापूर | उस्मानाबाद | सांगली | | |
| वाहतूक | - | १२ [२६.६६%] | ६ [१३.३३%] | ४ [८.८८%] | - | २३ [५१.११%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न विनिमय | - | - | २ [४.७६%] | १ [२.३८%] | - | ३९ [९२.८५%] | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | ४ [१०.५२%] | १ [२.६३%] | - | - | १ | ३२ | ३८ |
| | | | ८ [२१.५०%] | ५ [१३.५३%] | १ [२.६३%] | | |
| एकूण | ४ [३.२%] | १३[१०.४%] | १४ [११.२%] | | | ९४ [७५.२%] | १२५[१००%] |

पाहणी अंती असे स्पष्ट होते की, बहुतांशी हमाल स्थलांतरीत आहेत. १२५ हमालांपैकी १२१ [९६.८ टक्के] हमाल स्थलांतरीत आहेत. हमालांच्या मुलाखतीनुसार स्थलांतर केल्यानंतर प्रथम फिरते हमाल म्हणून काम केल्याचे आढळले. तसेच काहींनी प्रथम हॉटेलमध्ये अथवा चहाच्या गाडयावर कामगार, बांधकामावर मजूर म्हणून काम केल्याचे सांगितले. एकूण स्थलांतरीत हमालांमध्ये कोल्हापूर जिल्हा अंतर्गत स्थलांतर करणाऱ्या हमालांची संख्या अधिक आढळते. एकूण ९४ [७२.२ टक्के] हमाल तालुका स्थलांतरीत आहेत. हे तालुका स्थलांतरीत हमाल कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा, शाहूवाडी, राधानगरी - या तालुक्यामधून स्थलांतरीत झाले आहेत. हे सर्व अल्पभूधारक असून ज्या प्रदेशातून आले आहेत तो भाग डोंगराळ, मुरमाड व पाणीपुरवठयाच्या सोयींचा अभाव असलेला आहे. राज्य स्थलांतरीत हमाल हे कमी आढळतात. १३ [१०.४ टक्के] हमाल राज्य स्थलांतरीत होते. हे सर्व कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्हयामधील चिकोडी तालुक्यातून व विजापूर जिल्हयामधून स्थलांतरीत झाले आहेत. सर्वच स्थलांतरीत हमाल हे अल्पभूधारक होते. तसेच अवर्षणग्रस्त प्रदेश, पाणी-पुरवठयाच्या सोयींचा अभाव, दुष्काळ इत्यादी कारणांमुळे चरितार्थासाठी त्यांनी स्थलांतर केल्याचे आढळते.

स्थलांतरीत हमालांचा विभागवार आढावा घेता राज्यस्थलांतरीत हमाल वाहतूक विभागामध्येच अधिक आढळतात. कारण वाहतूक विभागामधील कामाची व वेतनाची बऱ्यापैकी शाश्वता असलेने लांबून येऊन कुटुंबासहित राहणे शक्य होते. तसेच रोजगाराच्या शोधार्थ परस्पर ओळखीने आले आहेत. कृषि-उत्पन्न-विनिमय-विभाग व धान्यबाजार विभागामध्ये तालुका स्थलांतरीत हमाल अधिक आढळतात. याचेकारण,

या विभागामधील कामाची कमी-जास्त उपलब्धता किंवा हंगामी काम यामुळे त्यांना शेती करणे शक्य होते.

मूळचे कोल्हापूरचे म्हणून जे ४ [३.२%] हमाल आहेत, त्यापैकी ३ विवाहित व १ अविवाहित स्त्री आहे. स्थलांतरीतांपैकी केवळ ५ हमालांनी प्रथम कुटुंबासहित स्थलांतर केले. यामध्ये ४ स्त्रिया आहेत. ११४ [ ९१.२ टक्के] हमाल कोल्हापूरमध्ये प्रथम एकटे आले आहेत.

सारांश, हमाली व्यवसायात येणा-या व्यक्ती आर्थिकदृष्टया कमकुवत कुटुंबातील असतात. अल्पभूधारकता व भूमिहीनता यामुळे कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न मर्यादित असते, परिणामी चरितार्थाच्या शोधार्थ हमाल औद्योगिक शहराकडे स्थलांतरीत होतात.